दिनांक २३ सप्टेंबर, २०१७ रोजी सिम्बायोसिस इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल बिझनेस येथे 'लीडरशिप सिरीज २०१७' हा कार्यक्रम संपन्न झाला.'ब्लू इकॉनमी ' हा या वर्षीच्या कार्यक्रमाचा मुख्य विषय होता. संस्थेच्या कुलपति डॉ. विद्या येरवडेकर यांच्या स्वागतपर भाषणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेच्या कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सहसचिव श्री संजय पांडा यांनी ब्लू इकॉनमी ही संकल्पना समजावून सांगितली. या सोबतच भारताचे ब्लू इकॉनमी मध्ये असलेले भौगोलिक आणि सामरिक महत्व नमूद केले. भारत सरकारच्या ब्लू इकॉनमी च्या वृद्धि साठी असलेल्या विविध धोरणांचा त्यांनी धावता धावता आढावा घेतला.

श्री शौम्मो आचार्य, संस्थापक-संचालक, ई-ट्रान्स सोल्यूशन प्रा. लिफ., यांनी ब्लू इकॉनमी आणि औद्योगिक क्षेत्र यांचा परस्पर संबंध विषद केला. या क्षेत्रातील अपुऱ्या तंत्रज्ञान आणि गुंतवणूकीबद्दल चिंता ही त्यांनी व्यक्त केली.

भारताचे फिलीपीन्स मधील माजी राजदूत श्री योगेन्द्र कुमार यांनी सागरी सुरक्षा, वातावरणीय बदल आणि त्याचे ब्लू इकॉनमी वर होणारे परिणाम सांगितले. आपल्या भाषणात त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय संबंध, समुद्राचे वाढलेले सामरिक महत्व उपस्थितांना पटवून दिले. शांततेच्यास्मार्गाने, परस्पर हितसंबंध जपूनच सागरी सुरक्षा साध्य करता येईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

भारताचे भारताचे मॉरिशस मधील उच्चायुक्त श्री अनुप मुद्गल यांनी सागरी बदलांमुळे होणारे पर्यावरणावर आणि मानवी जीवनावर होणारे परिणाम विषद केले. ढासळत्या सागरी जैवविविधतेबद्दल चिंता ही त्यांनी व्यक्त केली. सक्षम भारतीय अर्थव्यवस्थेसाठी शांततामय सागरी संबंधांची आणि ठोस सरकारी योजनांची गरज ही त्यांनी बोलून दाखवली.

मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या 'सेतुसमुद्रम प्रकल्प ', शाश्वत विकास याविषयावरील प्रश्नांना समर्पक उत्तरे दिली.
संस्थेचे उपसंचालक डॉ. प्रकाश राव यांनी आभारप्रदर्शन केले. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या संचालिका डॉ अस्मिता चिटणीस यांचे मार्गदर्शन लाभले.